International Referred Research Journal, May, 2011. ISSN- 0974-2832 RNI-RAJBIL 2009/29954.VoL.III *ISSUE-28

शोध पत्र- समाजशास्त्र

# महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ

May, 2011

* प्रा. सविता गिरे

* समाजशास्त्र विभाग, यशंवन्त महाविद्यालय, नांदेड

**प्रस्तावना :**

आदिवासी समूदाय प्राचीन काळापासून अस्तित्त्वात आहे. प्रगत समाजाच्या मुख्य प्रवाहापासून ते अलीप्त आहेत. त्यांची जीवन जगण्याची पध्दत इतर समूदायापेक्षा वेगळी आहे. आदिवासींना विविध नावांनी ओळखले जाते. डा. जी. एस. धूर्ये यांनी 'मागासलेले हिंदू' म्हटले आहे. डॉ. हट्टन व ढक्कर बापा यांनी आदिवासींना 'मुळनिवासी' म्हटले आहे, तर भारतीय संविधानाने अनुसूचीत जमाती असा उल्लेख केला आहे. आज महाराष्ट्रात आदिवासी जमातींचे तीन भाग आहेत. पहिला विभाग सह्याद्री विभाग म्हणून ओळखल्या जातो. ठाणे, नाशिक, पुणे, रायगड, अहमदनगर या जिल्ह्यांचा यात समावेश आहे. या भागात महादेव कोळी, वारली, कातकरी, कोकण, ठकार, ढोरकोळी, मल्हार कोळी, काथोडी इत्यादी प्रमुख आदिवासी जमाती आहेत. दुसऱ्या विभागास सातपुडा विभाग म्हणतात. धुळे, जळगाव, अमरावती, औरंगाबाद या जिल्ह्यांचा त्यात समावेश आहे. या विभागात भिड, गावीत, धानका, पावरा, हुव्वळा, कोलम, तडवी, मावची, कोरकू जमाती आहेत. तिसरा विभाग गोंडवन विभाग म्हणून ओळखला जातो. गडचिरोली. चांदा, भंडारा, यवतमाळ, नांदेड या जिल्ह्यांचा समावेश यात आहे. परधान, आंध, गोंड, भिल्ल, मोडिया गोंड, कोला कोया, हलवा, कवर इत्यादी जमाती या भागात आहेत. एकंदरीत महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत ९.२ टक्के (वनवासी-आदिवासी) जमातीचे प्रमाण आहे. महाराष्ट्राच्या १५००० चौ. मैल क्षेत्रात १७ लाख आदिवासी राहतात.

**आदिवासी चळवळची आवश्यकता :**

आदिवासी हे सुधारलेल्या जगापासून दूर दुर्गम दऱ्याखोऱ्यात राहतात. त्यांची जातिनिर्विष्ठ अशी एकच बोली ते बोलतात. ॲनिमिझम या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मूळ धर्माचे ते अनुयायी असून ते भूताखेतांची पूजा करतात. मृगया, कंदमुळें, फळे, शेतात पडलेला दाणागोटा यावर ते आपली उपजीविका करतात. क्वचित डोंगरातली शेतीही करतात. बहुतेक सगळे मांसाहारी आहेत. ते नग्न किंवा अर्धनग्न स्थितीत राहतात. झाडाची पाने किंवा सालींचा वापरही करतात. त्यांच्यात भटकी प्रवृत्ती आहे, मद्य आणि नृत्य हे त्यांना फार आवडते. हिंदू धर्मांचा त्यांच्यावर प्रीाव आहे. वाल्मिकीला ते आपला पूर्वज मानतात. आदिवासी हे मागासलेले, अशिक्षित, अज्ञानी, दरिद्री, सुधारणांचे वारे न लागलेले आहे. ते कोणी परके नाहीत, ते आपल्या समाजाचे अविभाज्य घटक आहेत. भारतीय प्राचीन वाङ्मयातही शबर, रक्श, निषाद, किरात असा त्यांचा उल्लेख आढळतो. त्यांनी ऐतिहासिक कालखंडात गौरवपूर्ण कामगिरी पार पाडली आहे. महाराणा प्रतापसिंह आणि शिवाजी महाराज यांना भिल्ल आणि कोळी यांनी साहाय्य केले. त्यांनी ब्रिटिशांविरूध्दही लढे लढविले आहेत. ते अत्यंत धाडशी, काटक, परिश्रमी आहेत. म्हणूनच त्यांना त्यांची संस्कृती टिकवून ठेवून देखील समाजप्रवाहात आणण्याच्या दृष्टीने चळवळ उभी करून विकास करणे गरजेचे आहे, हे लक्षात घेऊन महाराष्ट्रात अशा चळवळ उभी करण्याचा प्रयत्न काही समाजसुधारकांनी केला.

**आदिवासी चळवळ :**

आदिवासी चळवळीचा मागोवा घेतांना प्रथम असे लक्षात येते की ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी आदिवासींशी जवळीक साधून, त्यांच्यात मिसळून बराच काळ वावरून ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यासाठी मनोभूमिका तयार करण्याच्या हेतूने आदिवासी कलयाणाकडे लक्ष दिले. आदिवासींच्या शिक्षणाचा, त्यांच्या आरोग्याचा विचार त्यांनी उचलून धरला. त्यासाठी दवाखान्याची व्यवसथा केली. कुष्ठरोग्यांना त्यांनी जवळ केले. त्यांनी आदिवासी संवाद भाषेला प्रभावित केले. मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करयाचा प्रयत्न केला. ख्रिश्चन धर्मप्रसारकांकडून प्रेरणा घेऊन काही भारतीयांनीही आदिवासींचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधी १९२९ साली म्हणाले, "I envy this priest of the Dhede and the preceptor of the Bhils." की मला ठक्क बप्पाची असूया वाटते, अर्थात हे उद्‌गार आदरार्थी व ठक्क बप्पाच्या श्रेष्ठत्वाचे द्योतक आहेत. ते सिव्हील इंजिनियरिंगचा डिप्लोमा धारक होते. काही काळ त्यांनी दक्षिण आफ्रिकेत नोकरी केली. त्यानंतर ते मुंबई नगरपालिकेत नोकरीला आले. पण त्यांनी लवकरच नोकरी सोडली. त्यांनी १९१४ सालापासून भारत सेवक समाजाच्या कार्यात स्वतःला गोवून घेतले. त्यांना गोरगरिबांविषयी अत्यंत तळमळ होती. ते आयुष्यभर दीनदुबळ्या, अस्पृश्य, आदिवासी समाजासाठी झटत राहिले. पहिल्या गोलमेज परिषदेत आदिवासींच्या महत्त्वाची जाणीव अनेकांना झाली.

ह्यापूर्वी फक्त ठक्कर बप्पासारखी मोजकी माणसेच आदिवासींचा प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात विचार करीत असत. हरिजन सेवक संघाचे काम करत असतांना त्यांनी संपूर्ण हिंदुस्थानचा प्रवास केला. भिल्ल जातीच्या विषयी विशेष आस्था त्यांना होती. गिरीजनांसाठी काम करण्याची जबाबदारी फक्त ख्रिश्चन धर्मप्रसारकांची आहे. असे समजून हिंदु-समाज त्यांना वाळीत टाकीत होता. पिअरसन एलविन यांच्या कार्यामागे स्वार्थ होता, पण बप्पांच्या कार्याची प्रेरणा निखळ त्यागाची, मदतीची व त्यांचा विकास घडवून आणण्याची होती. त्यांना भिल्ल वस्तीत राम मंदिराची उभारणी करून भिल्ल जमातीच्या अंतःकरणात रामाची प्रतिष्ठापना केली. म्हणूनच महात्मा गांधीनी भिल्ल जमातीचे धर्मगुरू म्हणून त्यांचा उल्लेख केला. बप्पांनी भिल्ल समाजाला आदेश दिले, त्यात दररोज स्नान करणे, पिण्याचे पाणी गाळून पिणे, वधू मूल्य न घेणे, चोरी न करणे, लाच न घेणे, बाबदेवाची आराधना करणे इ. चा समावेश आहे. त्यामुळे भिल्ल समाजातीच्या वागण्यात खूपच फरक पडला. बप्पांनी आदिवासींना इतर समाजात मिसळून वागण्याच्या संदर्भात मार्गदर्शन केले. हळूहळू बदलात त्यांचा विश्वास होता. आदिवासींच्यासाठी ज्या घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या त्याचे श्रेय अमृतलाल ठक्कर (बप्पा) यांनाच आहे. आदिवासी तरूणांना मार्गदर्शन करून आदिवासी संघाची स्थापना करून

त्यांनी आपले स्वप्न साकार केले. संघाच्या मार्गदर्शनाखाली २१ संस्था सबंध देशभर त्यांच्या प्रेरणेने कार्यरत झाल्या. संघाचा व संस्थांचा उद्देश आदिवासीचे कल्याण हाच आहे. सबंध देशातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या पथदर्शकाची भूमिका बप्पांनी पार पाडली. सेवा आणि त्यागाचे ते मूर्तिमंद प्रतिक होते.

आदिवासींच्या विकासात ताराबाई मोडक व अनुताई वाघ या दोन महिलांचाही सिंहाचा वाटा आहे. शहरातील मुलांसाठी शिक्षणाच्या सगळ्या सोयी उपलब्ध असतात. मात्र दऱ्याखोऱ्यातून विखुरलेल्या आदिवासींसाठी काहीच सोयी नाही, जे जाणून ताराबाईंनी प्रथम बोंडी आणि नंतर ठाणे जिल्ह्यातील कोसबाड येथे आपले शैक्षणिक प्रयोग आदिवासींच्यासाठी यशस्वीपणे राबविले. शहरातील बालवाड्यांप्रमाणे आदिवासी मुले शाळेत येणार नाहीत, हे जाणून त्यांनी अंगणवाड्या सुरू केल्या. गपा, गोष्टी, गाणी, प्रत्यक्ष कार्य यातून त्यांनी शिक्षण द्यायला प्रारंभ केला. त्यांनी कुरण शाळेचा प्रयोग केला. आदिवासी मुलांना तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण त्यांनी दिले. अनेकांच्या पुनर्वसनाचाही प्रश्न त्यांनी सोडविला. आदिवासींना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. ताराबाईसोबत दुसरे जे नांव घेतले जाते ते अनुताई वाघ यांचे. १३व्या वर्षी वैधव्यानंतर आपले अपूर्ण शिक्षण पूर्ण करून काही वर्षे पुण्यात शिक्षिकेची नोकरी केली. महात्माजींच्या ग्रामशिक्षण याजनेत काम केले. त्यानंतर त्या ताराबाईंच्या सहवासात आल्या. ताराबाईंची बालशिक्षण, प्रौढशिक्षण आणि आदिवासी शिक्षण योजना त्यांनी अत्यंत हिरीरीने राबविली. कोसबाड प्रकल्प त्यांच्यामुळे नावारूपास आला. आदिवासी विकास संस्था आज कोसबाडच्या टेकडीवर कार्यरत आहे. चार पाळणाघरे, अकरा बालवाड्या, एक पूर्व प्राथमिक शाळा, तीस प्रौढशिक्षण वर्ग, बालसेविका वग्र, ट्रेनिंग कॉलेज, व्यावसायिक शिक्षा देणाऱ्या संस्था येथे कार्यरत आहेत. अनुताई शेकडो आदिवासींच्या माता झाल्या आहेत. पद्मश्री देऊन केंद्र सरकारने १९८४ साली त्यांचा गौरव केला. आदर्श शिक्षक, दलित मित्र हे राष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळाले. जनकल्याणाच्या संदर्भातील जमनालाल बजाज पुरस्कारही त्यांना मिळाला.

आदिवासींच्या विकासाला हातभार लावण्याच्या कामी ज्यांनी योगदान दिले त्यात दामुअण्णा टोकेकर यांचाही उल्लेख अपरिहार्य आहे. महाराष्ट्रातील वनवासी क्षेत्रात त्यांनी हिंदू सेवा संघ नावाने प्रथम थेरोडा गावी आणि त्यानंतर मनोर पालघर तालुका येथे सेवा कार्याला प्रारंभ केला. ग्रिाम वसतिगृह व त्यानंतर जोडीला शेती प्रकल्प उभा केला. आकणपासून २ कि.मी. वसतिगृह आहे. त्यात ३० वनवासी विद्यार्थी आहेत. आतापर्यंत ५०० विद्यार्थ्यांनी या वसतिगृहाचा लाभ घेतला. या प्रकल्पाअंतर्गत तळासरी येथे आदिवासी मुलामुलींसाठी शाळा सूरू करण्यात आली. १३० विद्यार्थी या शाळेचा लाभ घेतात. कल्याण-मुरमाड मार्गावर माणमोळी येथेही एक शेती वसतिगृह प्रकल्प सुरु झाला. ५० विद्यार्थ्यांचे वसतिगृह आहे. बीड जिल्ह्यातील डोमरी येथे सोनदरा गुरुकुलाची योजनाही डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांसाठीच आहे. सुमारे २२ वर्षापूर्वी सह्याद्री आदिवासी बहुविध सेवासंघातर्फे देवबांध येथे आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी एक प्रकल्प राबविण्यात येत आहे. यात गोपालन-शेळ्यापालन, वृक्षसंवर्धन, रुगणसेवा, वसतिगृह, सामाजिक वनीकरण, संस्कार केंद्र आदींचा समावेश आहे. ठाण्यापासून ८५ किलोमिटर्सवर असलेला तळासरी येथील वनवासी विद्यार्थी प्रकल्पने तर अत्यंत भरीव कामगीरी केली आहे. या प्रकल्पातून तयार झालेले डॉक्टर, वकिल वनवासी क्षेत्रात परत येऊन आदिवासींची सेवा करण्यासाठी बद्ध परिकर झालेले दिसतात. अशा प्रकारे आदिवासींच्या उत्कर्षासाठी अशासकीय पातळीवरही वाटचाल सूरू आहे. अजूनही या क्षेत्रात भरपूर कार्य करण्यासाठी वाव आहे.

**शासकीय पातळीवरील प्रयत्न :**

राष्ट्रीय प्रवाहात आदिवासींना सामावून घ्यायचे तर त्यांची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगती घडवून आणली पाहिजे हे सत्य ज्या प्रमाणे बिगर शासकीय पातळीवर स्वीकारले गेले. तसेच अलिकडे शासकीय पातळीवर देखील ते मान्य करण्यात येऊन महाराष्ट्र शासनाने आदिवासींच्या विकासाच्या अनेक योजना राबविण्यास प्रारंभ केला आहे. आदिवासी उपयोजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून मंत्रालय स्तरावर १९८३ साली आदिवासी विकास विभाग स्थापना करण्यात आला. १९७२ मध्येच आदिवासी विकास संचालनालयाची स्थापना झालेली होती. आदिवासी विकास संचालक नाशिक यांच्या नियंत्रणाखाली सह्याद्री विभाग (नाशिक) आणि गोंडवन विभाग (नागपूर) अशी दोन कार्यालये कार्यरत होती. त्यांच्या नियंत्रणाखाली २१ विकास अधिकायांची कार्यालये काम करीत होती. संचालनालयातर्फे ३९९ शासकीय आश्रम शाळा, २०३ अनुदानित आश्रम शाळा, १२९ शासकीय वसतिगृहे, वीजपंप, तेलपंप योजना, स्कॉलरशिप योजना राबविल्या जात होत्या. याशिवाय अतिरिक्त आयुक्त आदिवासी विकास नाशिक आणि नागपूर यांच्या नियंत्रणाखाली २० प्रकल्प अधिकारी कार्यालये कार्यरत होती. या व्यवस्थेमुळे अनेक वेळा कार्याची पुनरावृत्ती होत होती तर काही वेळा योजना प्रत्यक्ष आदिवासीपर्यंत पोहचणे अवघड झाले होते. म्हणून १९९२ साली आदिवासी विकास विभागाची पुनर्रचना करण्यात आली. संचालक आदिवासी विकास आणि आयुकत आदिवासी विकास नाशिक या दोन कार्यालयांची पुनर्रचना करून नाशिक येथे नविन आयुक्त कार्यालय निर्माण करण्यात आले. नाशिक, नागपूर, अमरावती व ठाणे येथे अतिरिक्त आयुक्त कार्यालये राहतील. त्यांच्या जोडील २३ प्रकल्प अधिकाऱ्यांची कार्यालये राहतील. ह्या नवीन संरचनेमुळे आदिवासी विकास योजनांचे नीट नियोजन करून इतर विभागांशी संपर्क साधून, पुनरावृत्ती टाळून आदिवासींच्या विकासाला वेगवान बनविले जाईल. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प अधिकारी विविध योजना कार्यान्वित करतील. या योजनांमध्ये विशेष घटक योजना, फलोत्पादन योजना, दुभत्या जनावरांचा पुरवठा, मत्स्यव्यवसाय साधने पुरवठा, गोण वनोपज विकास योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, रोजगार हमी योजना, जवाहर योजना, लघु सिंचन स्थानिक क्षेत्र, कोल्हापूर बंधारे, आदिवासी सहकारी संस्था, खादी ग्रामोद्योग आयोग पुरस्कृत योजना, लघु उद्योग बीज भांडवल योजना, जिल्हा परिषद शाळा विद्यार्थी विद्यावेतन, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ग्रामीण बाल व महिला विकास योजना, ठिबक सिंचन व तुषार सिंचन इत्यादी योजनांचा समावेश राहील.

**सारांश :** आदिवासी चळवळीने विकासाला गती प्राप्त करून दिली आहे. आदिवासींची सांस्कृतिक अस्मिता टिकवून समाज प्रवाहामध्ये सामावून घेण्याच्या प्रयत्नाला यश येऊ लागले आहे. आदिवासींच्या जीवनमानात फरक पडू लागला आहे. शासनाने उपकारकर्त्यांची भूमिका न घेता कर्तव्याची भूमिका बजाविणे आवश्यक आहे. तसेच आदिवासी बांधवांनीही स्वत:तील हीनता, लाचारी, स्वत:ला कमी लेखणे सोडून दिले पाहिजे. समाजाने देखील ते आपले बांधव आहेत ही भूमिका इमाने इतबारे पार पाडून भारतीय समाजाच्या या अविभाज्य घटकांला त्यात मिसळून जाण्याची संधी दिली पाहिजे.

## संदर्भ ग्रंथ

१) महाराष्ट्र शासन आणि राजकारण पृष्ठ क्र. १६०-१६३. २) खडसे भा.कि. 'जाती व वर्ग आणि भारतीय आदिवासी' -य.च.म.मु.विद्यापीठ २००२ ३) शहा घनश्याम, अनुवादक प्राची चिकटे, 'भारतातील सामाजिक चळवळी'.